# - कमवा व शिका योजना -

**अ. प्रस्तावना :** मानवांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे, म्हणून महात्मा फुलेंनी **''एका अविद्येमुळे सारे अनर्थ घडतात''** असे म्हटले आहे. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये याच भूमिकेतून विद्यापीठाने **''कमवा व शिका''** ही योजना अंमलात आणली आहे. गरीब, होतकरु व नियमित विद्यार्थ्यांना शिकत असतांना निवडक स्वरुपाच्या कामांची संधी उपलब्ध करुन देवून त्या मोबदल्यात नियमानुसार योग्य तो मेहनताना देवून त्यांच्या आर्थिक गरजा भागविणे व त्यांच्या शिक्षणात हातभार लावणे हा मुख्य हेतु या योजनेच्या मागे आहे. त्याकरीता अधिष्ठाता / प्राचार्य यांनी **प्रस्ताव पाठविण्यापुर्वी आवश्यक कागद-पत्रांची पूर्तता झाल्याची खात्री करुन घेतल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठवावा.**

**ब. उद्देश :**

१. आर्थिकदृष्टया दुर्बल, गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य करणे.

२. स्वावलंबनाने श्रमप्रतिष्ठा वाढविणे.

३. स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.

४. योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयांतील उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.

**क. विद्यार्थ्यांची निवड :**

१. या योजनेत भाग घेऊ इच्छिणारा विद्यार्थी विद्यापीठ विभाग / महाविद्यालयाचा नियमित विद्यार्थी असणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थी गरीब / होतकरु / गरजु असावा.

३. योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड संचालक - विद्यार्थी कल्याण यांच्या मार्फत केली जाईल.



**ड. योजनेतंर्गत करावयाच्या कामाचे स्वरुप :**

१. फार्मसी शॉप सहाय्यक.

२. केस पेपर बनवण्याचे काम.

३. ग्रंथालयातील कामे.

४. कार्यालय / महाविद्यालय विभागातील कामे.

५. झेरॉक्स काम करणे.

६. ग्राहक भांडार इत्यादी चालवणे.

७. वसतीगृह सहाय्यक.

८. फ्रुट स्टॉल चालवणे.

९. एस.टी.डी. / पी. सी. ओ. बुथ चालविणे.

१०. क्लिनीकल कामे.

११. अन्य गरजेनुसार कामे.

**इ. दिवसातील कामाचे तास :** या योजनेखाली दिवसाला जास्तीत-जास्त दोन तास काम द्यावे. कामाचे तास निश्चित करतांना वर्ग / अध्ययन वेळेव्यतिरिक्तची वेळ ठरवावी / निश्चित करावी. (त्याच्या अध्ययन वेळेत खंड होऊ नये)

**फ. कामाचा मेहनताना :**

१. महाविद्यालयांनी ''कमवा व शिका'' योजनेतंर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी व कामाचे तास याची नोंद प्रती दिवशी ठेवणे आवश्यक आहे. त्यावर संबंधीत विद्यार्थ्यांची उपस्थितीदर्शक स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

२. ''कमवा व शिका'' योजनेतंर्गत कामाच्या उपलब्धतेनुसार काम देण्यात यावे.

३. ''कमवा व शिका'' योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्याला महाविद्यालयात शिस्तविषयक नियम बंधनकारक असतील.

४. ''कमवा व शिका'' योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्याचा महाविद्यालयात / विद्यापीठात नोकरी / सेवेशी कोणताही संबंध राहणार नाही. या योजनेतंर्ग केलेल्या कामाच्या अनुभवाचा नोकरी/सेवा यासाठी कायदेशीर हक्क राहणार नाही.

५. ''कमवा व शिका'' योजनेत काम केल्याबद्दल शैक्षणिक वर्ष अखेरीस प्राचार्यांनी आपल्या सही शिक्क्यांनिशी सहभाग प्रमाणपत्र द्यावे.

६. ''कमवा व शिका'' योजनेत सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांनी दरवर्षी नव्याने प्रस्ताव मागवावे व त्यांची छाननी करुन योग्य ते प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठवावे.

७. प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या महाविद्यालयांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येईल, त्यांना ७५ टक्के रक्कम अग्रिम अनुदान म्हणून अदा करण्यात येईल. उर्वरित रक्कम ''कमवा व शिका'' योजनेच्या हिशोबपत्रक पुर्ततेनंतर अदा करण्यात येईल.

८. ''कमवा व शिका'' योजनेत सहभागी महाविद्यालयांकडून हिशोबपत्रके पुर्ण कागदपत्रांसह **दरवर्षी दि. ३० जुलै पूर्वी सादर करावेत.**

९. विद्यार्थ्यांना प्रति तास रु.२० विद्यापीठातर्फे व रु.१० महाविद्यालयाने अदा करावे.

१०. अंतीम वर्षात शिक्षण घेणाऱ्या व इंटर्नशिप करणाऱ्या विद्यार्थ्यास ही योजना लागु होणार नाही.

## ग. अटी व शर्ती

**१.** विद्यापीठाशी सलंग्नित असलेल्या महाविद्यालयातील हुशार,गरीब व नियमित विद्यार्थिनींकरीता लागू

**२.** पदवी पूर्व शिक्षण घेणाऱ्या ( UG ) विद्यार्थ्यांकरीता लागू

३. भारताबाहेरील (NRI) व महाराष्ट्राबाहेरील (OMS) विद्यार्थ्यींकरीता लागू नाही.

४. सदर योजनेतील लाभार्थी ठरविण्यासाठी आर्थिक दृष्टया मागास घटकांचा विचार करण्यात येईल. इतर बाबी समान असल्यास मागासवर्गीय विद्यार्थ्यांस प्राधान्य देण्यात येईल.

५. पालकांचे वार्षिक उत्पन्नाबाबतचा दाखला ग्राह्य धरतांना सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने (तहसिलदार) दिलेला अलीकडचा उत्पन्नाचा दाखला / फॉर्म १६ ची प्रत आवश्यक आहे.

६. विहीत नमुन्यातील अर्ज (फार्म ब )अधिष्ठाता / प्राचार्यामार्फत व त्यांच्या सही शिक्क्यांनिशी असणे आवश्यक आहे. तसेच सोबत जोडलेली प्रमाणपत्रे / सर्व सहपत्रे साक्षांकित केलेली असावी.



७. विहीत नमुन्यात नसलेले, अपूर्ण व साक्षांकित नसलेले, प्राचार्यांच्या मार्फत न आलेले तसेच निर्धारित मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज फेटाळले जातील.

८. एखाद्या विद्यार्थ्याने खोटे कागदपत्र सादर करुन लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थ्यांस वाटप केलेले सर्व अनुदान व्याजासह वसुल करण्यात येईल व योग्य त्या शिस्तभंगाच्या कारवाईसाठी तो / ती पात्र असेल यांची नोंद घेण्यात यावी.

९. कोणतेही कारण न देता योजनेबाबत निर्णय घेण्याचे, अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

## ह. कमवा व शिका योजनेच्या हिशोबाचे समायोजन करण्याकरिता खालील नमुद केलेल्या कागदपत्रांची एकत्रितरित्या पूर्तता करुन विद्यापीठास सादर करावा.

१. योजनेअंतर्गत महाविद्यालयाने विद्यार्थ्यास सोपविण्यात आलेल्या कामाचा उल्लेख करुन ''कमवा व शिका योजनेकरीता ____________________ ____(विद्यार्थ्याचे नाव)____ या आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या गरीब विद्यार्थ्यास काम देण्यात आले'' असे अधिष्ठाता / प्राचार्य यांचे प्रमाणपत्र.

२. योजना समन्वयक, अधिष्ठाता / प्राचार्य यांनी स्वाक्षरी केलेली कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्याचे दरमहा हजेरीपत्रकाची मुळप्रत.

३. योजनेत काम केलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या अनुदानातून देण्यात आलेल्या रक्कमेच्या व्हॉचरच्या मुळप्रती.

४. महाविद्यालयाने अदा केलेल्या रकमेच्या व्हॉचरच्या साक्षांकित प्रती.

५. सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षण केलेला सदर अनुदान रकमेचा जमा-खर्चाचा हिशोब.

६. सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate).

७. ''कमवा व शिका योजना'' राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिले असल्यास सदर अनुदानाची रक्कम **''कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक''** यांच्या नावे नाशिक येथे देय असलेला धनाकर्ष (Demand Draft) द्वारे विद्यापीठास तात्काळ परत करावा.

| विद्यार्थी / विद्यार्थिनीचा पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

## - अ -

**अर्जदाराचे नाव व पत्ता :**

______________________

______________________

प्रति,
**मा. संचालक - विद्यार्थी कल्याण विभाग,**
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

**विषय :** कमवा व शिका - योजनेसाठी विंनती अर्ज.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन मी. श्री. / श्रीमती / कु. ______________ ________________ विनंतीपूर्वक कळवू इच्छितो / इच्छिते की, मी आपल्या विद्यापीठात नियमित विद्यार्थी म्हणून शिकत आहे. माझ्या घरची परिस्थिती गरीबीची असल्याने शिक्षणासाठी स्वयंप्रयत्नाने थोडीफार आर्थिक मदत ''कमवा व शिका'' योजनेतून व्हावी, या हेतुने ''कमवा व शिका'' योजनेत सहभागी होवू इच्छितो / इच्छिते.

विद्यापीठाच्या ''कमवा व शिका'' योजनेद्वारे मला अंशकालीन काम देऊन सहभागी करुन घ्यावे, ही नम्र विनंती. योजनेच्या अटी, शर्ती, हिशोब, आर्थिक व्यवहार याबाबत सर्व नियमांचे मी पालन करीन व माझ्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू देणार नाही अशी हमी देतो / देते.

आपला / आपली आज्ञाधारक

College Seal

सही :

(नाव : )

**सोबत :** स्वयंवृत्त नमुना अर्ज.



## ''कमवा व शिका'' योजनांतर्गत प्रवेश मिळण्यासाठी करावयाचा स्वयंवृत्त नमुना अर्ज

| विद्यार्थी / विद्यार्थिनीचा पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

## - ब -

१. विद्यार्थ्यांचे नाव : ______________________
२. शिकत असलेल्या महाविद्यालयाचे नाव : ______________________
३. विद्यार्थ्याचा कायमचा निवासी पत्ता व दुरध्वनी/मोबा. क्र.: ______________________
______________________
४. जन्म तारीख : ______________ वय : __________ वर्ष
५. सध्या शिकत असलेला वर्ग : ______________________
६. मागील वर्षी झालेल्या परीक्षेत मिळालेले एकूण गुण व % वारी : ______________
(गतवर्षाच्या मार्कशीटची साक्षांकित प्रत सोबत जोडावी.)
७. हल्ली राहण्याचे ठिकाण : वसतीगृह/शहरात/नातेवाईकांकडे/स्वत:चे घरात.
८. शहरात राहत असल्यास/दररोज गावाहून येजा करत असल्यास अंतर ________ कि.मी.
९. वडीलाचे / पालकांचे नाव : श्री. / श्रीमती ______________________
१०. नोकरी / व्यवसाय : ______________________
११. एकत्रित वार्षिक उत्पन्न : रु. ____________ सक्षम प्रधिकाऱ्याचा दाखला जोडावा.
१२. कोणते काम निवडले आहे. : १. ______________________
२. ______________________
३. ______________________
१३. अध्ययन तासिका कालावधी व वेळापत्रक : ______________________
१४. योजनेत प्रवेश मिळाल्यास कोणत्या दिवशी व कोणत्या वेळेत कामाला येणार त्यांची माहिती : ______________________
१५. इतर माहिती : ______________________
______________________

**वर नमुद केलेली सर्व माहिती खरी आहे.**

**विभाग प्रमुखाचे नाव व स्वाक्षरी** **विद्यार्थ्यांचे नाव व स्वाक्षरी**

**अधिष्ठाता / प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का**